# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. एमडीएफ/ओडी/1380/जन, दिनांक - 10.08.2022

## शुध्दीपत्रक

विषय :- गणेशोत्सव -2022 करिता सुधारित मार्गदर्शिका.

संदर्भ :- 1. क्र. एमडीएफ/ओडी/1164/जन, दि. 22.07.2022.
2. क्र. एमडीएफ/3483/जन, दि. 23.03.2022.

विषयांकीत प्रकरणी उपरोक्त संदर्भित परिपत्रकांचे अवलोकन करण्यात यावे, ही विनंती. सदर परिपत्रकांपैकी उपरोक्त संदर्भ क्र. 1 अन्वयेच्या परिपत्रकात अनु. क्र 2 येथे खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना नमूद केली आहे -

'गणेशोत्सव 2022 करिता मूर्तिकारांच्या मंडपांकरिताचे शुल्क प्रमुख अग्निशमन अधिकारी यांच्याकडून पूर्णपणे माफ करण्यात येईल. तसेच ज्यांनी अगोदर शुल्क भरले असेल तर त्यांना सदर शुल्काचा परतावा करण्यात येईल'.

त्याऐवजी, अनु. क्र. 2 मधील मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे वाचण्यात यावी. तसेच अनु. क्र. 2 ए नव्याने समाविष्ट करण्यात आली आहे. त्याची कृपया नोंद घेण्यात यावी.

'गणेशोत्सव 2022 करिता मूर्तिकारांच्या मंडपांकरिता विभाग कार्यालयांमार्फत आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात येईल. तसेच ज्यांनी अगोदर विभाग कार्यालयात शुल्क भरले असेल तर त्यांना सदर शुल्काचा परतावा विभाग कार्यालयामार्फत करण्यात येईल'.

अनु. क्र 2 ए – अग्निशमन अधिकारी यांजकडून आकारण्यात येणारे शुल्कदेखील माफ करण्यात येईल. तसेच ज्यांनी अगोदर अग्निशमन अधिकारी कार्यालयात शुल्क भरले असेल तर त्यांना सदर शुल्काचा परतावा अग्निशमन अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात येईल'.

उप आयुक्त (परि.-दोन)

**प्रत रवाना –**

**सह आयुक्त / उप आयुक्त (परि-1, 3, 4, 5, 6,7), मा.महोदय/महोदया,**
**सहाय्यक आयुक्त, ए ते टी विभाग, महोदय/महोदया,**
**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता), महोदय,**
**अनुज्ञापन अधिक्षक, महोदय,**

उद्यान अधिक्षक, महोदय,

प्रमुख अग्निशमन अधिकारी, महोदय,

मा. महापालिका आयुक्तांचे स्वीय चिटणीस, महोदया,

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (शहर) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,

मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय चिटणीस, महोदय,

मूर्तीकार / समन्वय समित्या

जन संपर्क अधिकारी

उप आयुक्त (परि.-दोन) यांचे

प्रशासकीय अधिकारी